World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2018; 4(8): 80-81
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''ख्रिस्ती धर्माचे जागतिक स्वरूप''

**विश्वास गोरखनाथ वळवी**

**Abstract**
The largest religion in the world is Christianity. Its population is 29 percent of the world's population. In addition, the United States, Brazil, Mexico, Russia, the Philippines, Nigeria, China, Germany, Ethiopia, etc. Many non-Christians have expressed their views on Christianity. But Mahatma Gandhi's views and views on Christianity are also worth considering. He lived among Christians, exchanged views with them, and finally revealed what he thought of Christianity and Christian people in his book, The Message of Jesus Christ.

**Keywords:** Christianity, Christ, Christians, Religion, Jesus Christ, Reformation, Sects, Christian, Churches, Augustine

## प्रस्तावना

विश्वात सर्वात मोठा धर्म हा ख्रिस्ती धर्म आहे. त्याची लोकसंख्या जगाच्या २९ टक्के आहे. तसेच अमेरिका, ब्राझील, मेक्सिको, रशिया, फिलिपिन्स, नायजेरिया, चीन, जर्मनी, इथिओपिया इत्यादी देशात ख्रिस्ती धर्माची सर्वाधिक लोकसंख्या आहे. संप्रदायाच्या दृष्टीने, कॅथलिक ५०%, प्रोटेस्टंट ३७%, ओथोडोक्टस १२% आणि इतर अपंथीय १% ख्रिस्ती लोक जगात वावरत आहे. २०१५ च्या जागतिक लोकसंख्या जनगणनेनुसार जगात २ अब्ज ४ करोड ख्रिस्ती धर्माची लोकसंख्या आहे. भारतात हे प्रमाण २.३% असून महाराष्ट्रात २.५०% आहे. अमेरिका खंडात सर्वाधिक ३७%, युरोपमध्ये २६%, आफ्रिका खंडात २४% आणि आशिया खंडात १३% ख्रिस्ती धर्माची लोकसंख्या आढळून येते.

आज जग हे पोस्ट रिलीजीनकडे प्रयान करीत आहे आणि धर्माची मूल्ये ही मानवतावादी दृष्टिकोणाकडे झुकत चाललेली आहे. त्यामुळे ख्रिस्ती धर्माला देखील आपले आव्हान टिकून ठेवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. ख्रिस्ती धर्मातून फुटून अनेक सांप्रदायिक शाखा अस्तित्वात येत आहे. अपंथिय मंडळ्या वाढत आहे. यामुळे ख्रिश्चन धर्माची लोकसंख्या वाढत असली तरी त्यात भरपूर बदलाव घडून येत आहे. अनेक पंथ-उपपंथ पवित्रशास्त्राला लागून नाही. अशा पंथाची संख्या वाढल्याने खऱ्या ख्रिस्ती धर्माला कुठेतरी काळीमा लागत आहे. आधुनिक जगाची आकर्षक आणि मोहभावी मूल्ये यांचा शिरकाव झाल्यामुळे सत्य उघडपणे प्रचारित करण्यास काही अंशाने खऱ्या ख्रिस्ती मंडळांना अडचण येत आहे.

ख्रिस्ती धर्म हा एक ऐतिहासिक प्रवाह आहे. जो गेल्या दोन हजार वर्षापासून वाहत आहे. येशू ख्रिस्ताच्या पूर्ण जन्माच्या नोंदी अथवा भविष्यवाण्या बायबलच्या जुन्या करारातून सांगीतलेल्या आहे. इ.सनाच्या पहिल्या शतकात इस्रायल राष्ट्रात बेथलेहेम गावी यहूदाच्या वंशात येशू ख्रिस्ताचा जन्म झाला. रोमन सत्ता ही जागतिक महासत्ता म्हणून यहुद्यांवर राज्य करीत होती. एक दिवस आम्हाला गुलामीतून सोडविणारा, भौतिकतेच्या वलयामधून सोडविणारा मसीहा (राजा) येईल. या आशेत यहुदी समाज जगत होता. देवाच्या आणि मनुष्याच्या कृपेत वाढणारा ख्रिस्त, आपल्या सुधारणावादी शिक्षणाने यहुदी पुढाऱ्यांचा कर्मकांडाना ढवळून काढले. सुधारणांचे नवीन वारे पहिल्या शतकात सुरू झाले. हे वारे यहुदी पुढाऱ्यांच्या कानाला त्रास देऊ लागले आणि त्यांनी कटकारस्थान रचून ख्रिस्ताला क्रुसावर खिळले. सुधारणांचा आणि तारणाचा मार्ग दाखविणाऱ्या ख्रिस्ताच्या शिष्यांनी अनेक छळ सहन करून ख्रिस्ताचा उपदेश संपूर्ण जगात प्रचारित करण्याचे काम केले. इ. सनाच्या चौथ्या शतकात ख्रिस्ताच्या शिक्षणाला धर्मात गुंडाळण्यात आले आणि ख्रिस्ती धर्म रोमन सत्तेचाच नाही तर जागतिक धर्म बनला. पुढे या धर्मात मूर्तीपूजा यांचा शिरकाव झाला. सामान्य लोकांना छळले जाऊ लागले. त्याची वाचा सेंट

ऑगस्टीन याने 'द सिटी ऑफ गोड' या ग्रंथाच्या माध्यमातून फोडली.

सेंट ऑगस्टीन याचे पाचव्या शतकातील कार्य धर्मसुधारणाची सुरुवातीची ठिणगी होती. ही ठिणगी पूर्ण रुपाने पेटविली ती सोळाव्या शतकात मार्टिन ल्युथर या पादरीने. हे शतक धर्मसुधारणा आणि स्वातंत्र्याचे नवे शतक होते. अंधश्रद्धा, पाप, मूर्तीपूजा याच्या बंधनातून सुटण्याचे होते. सतराव्या शतकापासून मिशनरी चळवळीचे नवीन अध्याय सुरू झाले. स्थानिक मंडळ्या आणि गृह मंडळ्या संपूर्ण जगात स्थापन होऊ लागल्या. विसाव्या शतकाच्या अंतिम पर्वापासून ख्रिस्ती धर्म वेगवेगळ्या प्रांतात आणि अपंथात विलीन झाला. आज ख्रिस्ती धर्म जागतिक धर्म बनला असून त्यांने स्वतःला एका जागेत स्थिर बसवून घेतले आहे. सामाजिक आणि राजकारण या दोहोत चर्चला उभे करून त्याला राजाश्रय मिळावा म्हणून प्रयत्न करीत आहे. पण खरा ख्रिस्ती धर्म जगणारे आणि जपणारे आजही रक्तसाक्षी होत आहे. त्याचाच परिणाम आज खऱ्या ख्रिस्ती धर्माचा ऐतिहासिक प्रवाह टिकून आहे आणि हा प्रवाह कधीही न मिटणारा असा आहे. कारण या प्रवाहाचा मुख्य रक्षक ख्रिस्त आहे.

ख्रिस्ती धर्माबद्दल अनेक ख्रिस्तीतेर लोकांनी आपली मते आणि विचार जाहीर केलेले आहे. पण त्यामध्ये महात्मा गांधी यांचे ख्रिस्ती धर्माबद्दलचे विचार आणि मते ही विचार करण्याजोगे आहे. ख्रिस्ती लोकांमध्ये ते राहिले, त्यांच्यासोबत विचारांची देवाण-घेवाण केली आणि अंतिमतः ख्रिस्ती धर्माबद्दल आणि ख्रिस्ती लोकांबद्दल त्यांचे काय विचार होते हे त्यांनी आपल्या 'द मेसेज ऑफ जीजस ख्राईस्ट' या पुस्तकातून जाहीर केले.

## संदर्भसूचीः-


1. www.vishwakosh.marathi.gov.in Date 15/11/2017, Time 11.13 AM
2. पाश्चिमात्य तत्वज्ञानाची कहाणी, साने गुरुजी वरदा प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २०११, पृ.क्र.